वाचा:

१. म.जि.प.व पं.स.अधिनियम १९६१ चे कलम १२५ अन्वये नुसार प्रशासकिय मान्यता प्रदान अधिकार.

२. शासन निर्णय क्रमांक - व्हीपीएत-२६१०/प्र.क्र.१२९/पंरा-४/ ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२, दि. १६ सप्टेंबर, २०१०.

३. शासन निर्णय क्रमांक - व्हीपीएत-२६१०/प्र.क्र.१२९/पंरा-४/ ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२, दि. २० ऑक्टोबर, २०११ व शुध्दीपत्रक २०.१०.२०११, २१.११.२०१२, १५.३.२०१५ व दि. २०८२०१

४. शासन निर्णय क्रमांक - व्हीपीएत-२६१०/प्र.क्र.२७२/पंरा-४/ ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२, दि. १५ मार्च, २०१५.

५. शासन निर्णय क्रमांक - व्हीपीएत-२०१५/प्र.क्र.२१४/पंरा-४/ ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२, दि. ०१ ऑगस्ट, २०१६.

६. जिल्हा नियोजन अधिकारी, जि.नि. समिती, जालना यांचे अर्थकल्पीय नियतव्ययाचे पत्र क्रं. ६८९ दि. ०५.०७.२०२१

७. मा.पालकमंत्री तथा अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती जालना यांचे दि. ०४/०३/२०२२ निवडीबाबत पत्र.

८. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जालना अन्वये कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाबत यांचे पत्र क्रमांक जा.क्र/जिनिस/जिवायो/२०२१-२२/३२५ दि.०९/०३/२०२२.

९. गट विकास अधिकारी, पं.स. यांचा ग्रामपंचायतीं ग्रामसभेचा प्रस्ताव.

जा.क्रं.जिपजा/पंचा-५/नियो/२०२१-२२/1111
कार्यालय जिल्हा परिषद, जालना
दिनांक :- २९/०३/२०२२.

## : प्रशासकीय मान्यता आदेश :

उपरोक्त संदर्भिय (२) ते (५) च्या शासन निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत मोठया ग्रामपंचायतीला नागरी सुविधासाठी विशेष अनुदान (विद्युतीकरणासह) या योजनेतंगत ५००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींचा समावेश या योजनेत करावयाचा असून त्यान्वये सन २०२१-२२ मध्ये खालील १५ ग्रामपंचायती निवड संदर्भ क्रं. (७) व (८) अन्वये केलेली आहे.. संदर्भ क्रं. (६) अन्वये सदर योजनेत एकूण २००.०० लक्ष निधी नियतव्यय करण्यात आलेला आहे.

संदर्भ क्रं (१०) व (११) अन्वये ग्रामपंचायतीने ग्रामसभेच्यो मान्यता सह प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. तेव्हा खालील प्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे

(रक्कम लक्ष मध्ये)

| अ. क्र | तालुका | ग्रा.पं.नांव | मंजुर कामाचे नांव | शासन हिस्सा ९०% | ग्रा.पं. हिस्सा १०% | एकूण प्रशासकीय मान्यता रक्कम | कार्यान्वीत यंत्रणा (संबंधित ग्रा.पं.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंबड | शहागड | बाजार ओटे व बाजारात पेव्हर ब्लॉक बसविणे | १३.५० | १.५० | १५.०० | संबंधित ग्रा.पं. |
| २ | | | बाजार अंतर्गत सिमेंट रस्ता | ६.५० | ०.७२ | ७.२२ | संबंधित ग्रा.पं. |
| | | | | **२०.००** | **२.२२** | **२२.२२** | |
| ३ | अंबड | गोंदी | बाजारामध्ये सिमेंट कॉक्रिट रस्ता करणे | ९.०० | १.०० | १०.०० | संबंधित ग्रा.पं. |
| ४ | | | कांतीलाल गिरुटे ते अंगणवाडी पर्यंत सिमेंट कॉक्रिट रस्ता करणे | ७.२० | ०.८० | ८.००० | संबंधित ग्रा.पं. |
| ५ | | | गावातंर्गत जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारणे | ३.८० | ०.४२ | ४.२२ | संबंधित ग्रा.पं. |
| | | | | **२०.००** | **२.२२** | **२२.२२** | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | अंबड | महाकाळा | बाग बगीचा व उद्यान तयार करणे | ७.६५ | ०.८५ | ८.५० | संबंधित ग्रा.पं. |
| ७ | | | सार्वजनिक दिवाबत्तीचे सोय करणे | ५.६० | ०.६२ | ६.२२ | संबंधित ग्रा.पं. |
| ८ | | | भुमिगत नालीचे बांधकाम करणे | ६.७५ | ०.७५ | ७.५० | संबंधित ग्रा.पं. |
| | | | | **२०.००** | **२.२२** | **२२.२२** | |
| ९ | भोकरदन | जळगांव सपकाळ | भुमिगत नालीचे बांधकाम करणे | १०.०० | १.११ | ११.११ | संबंधित ग्रा.पं. |
| १० | भोकरदन | पिंपळगाव रेणूकाई | जनाबाई चिकटे ते प्रभत आहेर यांच्या घरापर्यंत भुमीगत गटार बांधकाम करणे | १०.०० | १.११ | ११.११ | संबंधित ग्रा.पं. |
| ११ | भोकरदन | धावडा | भुमीगत नाली बांधकाम करणे | १०.०० | १.११ | ११.११ | संबंधित ग्रा.पं. |
| १२ | भोकरदन | वालसांवगी | सलीम मिस्तरी यांचे घरापासून ते नेवरे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० | १.११ | ११.११ | संबंधित ग्रा.पं. |
| १३ | घनसांवगी | कुंभार पिंपळगांव | गावातंर्गत सिमेंट रस्ता करणे | १०.०० | १.११ | ११.११ | संबंधित ग्रा.पं. |
| १४ | | | भुमीगत नाली बांधकाम करणे | १०.०० | १.११ | ११.११ | संबंधित ग्रा.पं. |
| | | | | **२०.००** | **२.२२** | **२२.२२** | |
| १५ | घनसांवगी | रांजणी | फैस मेडिकल ते मुसा कुरेशी यांचे घरापर्यत भुमिगत गटार बांधकामकरणे | १०.०० | १.११ | ११.११ | संबंधित ग्रा.पं. |
| १६ | | | सोनू कचरे यांचे घर ते सलीम भाई हॉटेल पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे | १०.०० | १.११ | ११.११ | संबंधित ग्रा.पं. |
| | | | | **२०.००** | **२.२२** | **२२.२२** | |
| १७ | जालना | सेवली | गावातंर्गत सिमेंट रस्ता करणे | १०.०० | १.११ | ११.११ | संबंधित ग्रा.पं. |
| १८ | जालना | नेर | गावातंर्गत सिमेंट रस्ता करणे | १०.०० | १.११ | ११.११ | संबंधित ग्रा.पं. |
| १९ | जालना | देवमुर्ती | प्रेम चांदणे यांचे घर ते जालना-मंठा हायवे पर्यंत भुमिगत नाली बांधकाम करणे | १०.०० | १.११ | ११.११ | संबंधित ग्रा.पं. |
| २० | मंठा | तळणी | वसंतनगर (तांडा वस्ती) मध्ये भुमिगत नाली बांधकाम करणे | १०.०० | १.११ | ११.११ | संबंधित ग्रा.पं. |
| २१ | परतूर | सातोना खुर्द | सातोना आष्टी रोड ते अंगत आकार यांचे घर, खान सिस्टर यांचे घर ते बंजारा वस्ती या ठिकाणी सिमेंट कॉक्रिट रस्ता करणे | १०.०० | १.११ | ११.११ | संबंधित ग्रा.पं. |
| | | | | **१९०.००** | **२१.११** | **२११.११** | |

वरील कामांना ग्रामसभेने दिलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या अधिन राहुन व खालील अटी व शर्ती च्या अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे

**सदर मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन देण्यात येत आहे.**

१. सदर मान्यता शासन निधी ९०% व ग्रामपंचायत निधी १०% अन्वये देण्यात येत आहे.
२. शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सदर योजनेच्या एकूण रक्कमेपैकी १०% हिस्सा हा संबंधित ग्रामपंचायतेच्या उत्पन्नातुन प्रस्तावित कामावर खर्च करुन पं.स.कडून मुल्यांकन करुन घ्यावे व उर्वरीत शासन हिस्सा ९०% चे काम करावे. ग्रा.पं. १०% हिस्सा संबंधित खात्यात जमा केल्यानंतरच उर्वरित शासनाकडून देय असलेला ९०% हीस्सा खर्च करण्यात ग.वि.अ. यांनी परवानगी दयावी.

३. कार्यान्वयीन यंत्रणेने दर ३ महिण्याला कामाबाबतची माहिती ग्रामसभेला देणे बंधनकारक राहील. व निधीचा प्रस्ताव सादर करतांना ग्रामसभेमध्ये कामाची माहिती दिल्याबाबतची ग्रामसभा ठराव सादर करणे अनिवार्य राहिल.
४. उपरोक्त कामास सक्षम अधिकाऱ्याने तांत्रिक मान्यतेच्या अधिक राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.
५. कार्यालवयीन यंत्रणेनी प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्यापुर्वी या कामास नियोजित पाटबधांारे / जलविद्युत/ पाणी पुरवठा प्रकल्पाच्या जलाशयाखाली जाण्याची शक्यता नाही याची खात्री करणे बंधनकारक आहे.
६. शासकीय जमीनीवर करावयाच्या बांधकामाबाबत सक्षम अधिकारी यांची परवानगी घेणे, तसेच खाजगी जागा असल्यास जागेचे दानपत्र नियमानुसार रजिस्टी दानपत्र करुनच कामास सुरुवात करणे बंधनकारक आहे. जागेबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणांची राहील.
७. सदर कामावर मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही, तसेच मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होत असल्यास जिलहाधिकारी यांची मान्यता घेऊनच काम पुर्ण करणे बंधनकारक आहे. पुर्वपरवानगी शिवाय बांधकाम आकारमानात कसलाही बदल करता येणार नाही.
८. या कार्यक्रमांतर्गत मंजुर कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबंधीत कार्यान्वयी यंत्रणेची तसेच जिल्हा वार्षिक योयजनाचे खर्चाचे उपयोजिता प्रमाणपत्र पुर्णत्वाचे दाखले, खर्चाच्या ताळमेळ व विनियेजन लेखे, लेखापरिक्षण इत्यादी बाबतची सर्व कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित यत्रणेची राहील.
९. संबंधीत यंत्रणेने मासिक खर्च व भौतिक अहवाल दरमहा ५ तारखेपर्यात या कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.
१०. या कार्यक्रमांतर्गत होणाऱ्या खर्चाचा हिशोब विहित पध्दतीनुसार स्वतंत्रपणे वगळा ठेवण्यातयावा.
११. मंजूर कामांची तपासणी करण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयातील तपासणी पथकास व जि.प.संबंधित तांत्रिक अधिकाऱ्यांना राहतील, वेळोवेळी आवश्यक ती कागदपत्र उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणांची राहील.
१२. सदर प्रकारची कामे ५ वर्षापुर्वी इतर कोणत्याही योजनेतुन घेण्यात आलेली नाहीत, याची खात्री करुनच कामाची प्रतयक्ष सुरुवात करणे बंधनकारक राहील. तसे झाल्यास संपूर्ण जबाबदारी यंत्रणेची राहील.
१३. एक वेळेस मंजूर झालेल्या कामाचे प्रशासकीय मान्यता आदेश कोणत्याही परिस्थितीत महत्वाची तांत्रिक अडचण निर्माण झाल्याशिवाय रद्द करता येणार नाहीत.
१४. सदरील कामे अर्थिक वर्षात (दिंनाक ३१.३.२०२३ पर्यतंच) पुर्ण करणे अनिवार्य आहे.
१५. सदर काम या अगोदर इतर योजने मधून मंजुर करण्यात आले असल्यास गट विकास अधिकारी यांनी सदरील कामे सुरु करु नये व तसे या कार्यालयास तात्काळ कळवावे.
१६. सदर मंजुर कामावरील निधी हा अखर्चीत रहाणार नाही याची दक्षता संबधित कार्यान्वयीन यंत्रणेनी घ्यावयाची आहे.
१७. सदरील काम रुपये ३.०० लक्ष च्या वरील असल्यामुळे ग्रा.पं.तीने ई-निविदाव्दारे करण्यात यावे किंवा ग.वि.अ. यांनी काम ग्रा.पं.ला यंत्रणा म्हणून देण्यात आले तर ग्रा.पं.तीने कामावर साहित्य खरेदी करतांना एकाच वस्तूची/साहित्याची किंमत रु. १.०० लक्ष पेक्षा जास्त असल्यास प्रत्येक बाब निहाय ई-निविदेच्या माध्यमातूनच खरेदी करण्यात यावी.
१८. सदरील काम यापुर्वी कोणत्याही योजनेतून झाले नाही याची तपासणी विस्तार अधिकारी(पं.) यांच्याकडून करुन घेवून ई निविदा ग्रामपंचायत कडून करुनच तदनंतरच गट विकास अधिकारी यं ानी कार्यरंभ आदेश घेण्यात यावे. सदर काम दुबार झाल्यास संबंधित गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक, सरपंच यांना जबाबदार धरुन पुढील ये ाग्य ती कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.
१९. काम सुरु करण्यापूर्वी ज्या ठिकाणी काम करावयाचे आहे त्या ठिकाणचे Geotag फोटो, काम प्रगतीत असतांनाचे फोटो Geotag व काम अंतीम चे Geotag फोटो प्रत या कार्यालास सादर करणे अनिवार्य राहिल.

**(स्थळ प्रत मा. मु.का.अ. यांची स्वाक्षरी असे/-)**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, जालना करिता**

**प्रतिलीपी: माहिती तथा कार्यवाहीस्तव.**

१. मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती,जालना यांना माहितीस्तव सादर.
२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.जालना.
३. कार्यकारी अभियंता (बांधकाम) / (पाणी पुरवठा) जि.प.जालना.